MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. ०२/२०१५–१६

## जाहीर सूचना

### प्रारुप विद्युत पुरवठा संहिता विनियम, २०१५ वर अभिप्राय मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १८१ आणि अन्य संबंधित कलमांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून ''महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २०१५'' चे प्रारुप तयार केले आहे. हे प्रस्तावित विनियम पूर्वीच्या सन २००५ च्या विनियमांना अधिक्रमित करतील.

हे प्रारुप विनियम www.merc.gov.in / www. mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

आयोग, याद्वारे वरील प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित असून त्या ६ (१+५) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. ०२२–२२१६३९७६ किंवा **mercindia@merc.gov.in** या ई–मेल द्वारा पाठवाव्यात.

दि. २२ मे, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २२ एप्रिल, २०१५**

**स्वाक्षरी/–**
**सचिव, मविनिआ**